# महाराष्ट्र शासन
# नियोजन विभाग,
# आयुक्त, अर्थ व सांख्यिकी,

नवीन प्रशासन भवन, ८ वा माळा, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र. ०२२-२२०२०००६ Email-ID: commissioner.es@maharashtra.gov.in


## जाहीर सूचना

अर्थ व सांख्यिकी संचालनालयाअंतर्गत मुख्य कार्यालय, मुंबई, ६ प्रादेशिक कार्यालये व ३६ जिल्हा सांख्यिकी कार्यालयांमध्ये Periodic Labour Force Survey (PLFS) व Annual Survey of Unincorporated Sector Enterprises (ASUSE) ही सांख्यिकी सर्वेक्षणे व अनुषंगिक इतर कामकाज पार पाडण्यासाठी सेवानिवृत्त शासकीय अधिकारी / कर्मचारी **(२ उपसंचालक व ५२ संशोधन अधिकारी /सहाय्यक संशोधन अधिकारी)** यांच्या सेवा करार पद्धतीने घ्यावयाच्या आहेत. त्यासाठी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थाम (का.१३), दिनांक १०/०६/२०२५ मधील अटी व शर्तीनुसार नामिकासूची तयार करण्यासाठी पात्र व इच्छुक सेवानिवृत्त शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्याकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. याबाबतची सविस्तर जाहिरात अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या https://mahades.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर पहावी.

**अर्ज सादर करण्याची कार्यपद्धती :**

अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर https://mahades.maharashtra.gov.in प्रसिद्ध करण्यात आलेल्या सविस्तर जाहिरातीत नमूद केलेल्या पात्रता, वयोमर्यादा धारण करणाऱ्या इच्छुक व पात्र सेवानिवृत्त अधिकारी यांनी जाहिरातीतील अटी तसेच सूचनांनुसार विहित नमुन्यात **दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत** स्वतः साक्षांकित केलेले अर्ज सादर करावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे, अपूर्ण किंवा अटींची पूर्तता न करणारे अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारार्थ घेतले जाणार नाहीत. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. प्राप्त झालेल्या अर्जाची आवश्यक ती पडताळणी करुन मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवारांना मुलाखतीकरिता कोणताही प्रवास भत्ता देय राहणार नाही. उमेदवार निवडीबाबतचा अंतिम अधिकार अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई यांचा राहील.

**दिनांक : ११/०२/२०२६**
**स्थळ : मुंबई**

**स्वाक्षरी/-**
**डॉ. ज्योत्स्ना पडियार (भा.प्र.से.)**
**आयुक्त,**
**अर्थ व सांख्यिकी संचालनालय,**
**मुंबई**

**[DGIPR-2025-26/ क्र.5/C-5696]**

Mahabharti.in